# T17/AGR213/EE/20160305

**वेळ : 3 तास** **गुण : 80**

**सूचना :**

1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.
2) प्रत्येक उप-प्रश्न पाच गुणांचा आहे.
3) प्रत्येक उप-प्रश्नाचे उत्तर 75 ते 100 शब्दांत लिहा.
4) पहिल्या ओळीमध्ये प्रश्न क्रमांक आणि उप-प्रश्न लिहिल्यानंतर उत्तरे लिहा. प्रत्येक प्रश्नाचे उत्तर स्वतंत्र पृष्ठावर लिहावे.

---

1. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) भारतात फुलबाग लागवडीच्या समस्या कोणत्या आहेत ते थोडक्यात लिहा. 5

ब) फुलशेतीसाठी सर्वसाधारणपणे कशी जमीन आवश्यक असते? 5

क) पश्चिम महाराष्ट्र मैदानी पट्ट्याची वैशिष्टे सांगून या विभागातील फुलपिकांची नावे लिहा. 5

ड) बाजारपेठेच्या अंतरावर फुलशेती कशा प्रकारे अवलंबून असते? 5

इ) फुलपिकांच्या लागवडीच्या पद्धती उदाहरणासहित स्पष्ट करा. 5

2. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) पालाशच्या कमतरतेमुळे फुलपिकावर कोणती लक्षणे आढळतात? 5

ब) तुषार सिंचन म्हणजे काय हे सांगून त्याचे फायदे लिहा. 5

क) मोठ्या दिवसात वाढणारी झाडे म्हणजे काय ते उदाहरणासह स्पष्ट करा. 5

ड) लैंगिक अभिवृद्धीचे फायदे व तोटे लिहा. 5

इ) कलम यशस्वी होण्यासाठी कोणत्या बाबी आवश्यक आहेत. 5

3. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) स्थलांतराच्या पद्धती कोणत्या ते सांगून त्यातील एका पद्धतीचे सविस्तर वर्णन करा. 5

ब) उत्पादन वाढीसाठीच्या कोणकोणत्या उपचार पद्धती आहेत? त्यातील एका उपचार पद्धतीची सविस्तर माहीती लिहा. 5

क) संजीवके आणि संप्रेरके यातील फरक सांगून संजिवकांचा फुलशेतीतील उपयोग लिहा. 5

ड) कंदाचे विविध प्रकार सांगून त्यांची वैशिष्टे उदाहरणासहित स्पष्ट करा. 5

इ) फुलांची वर्गवारी करताना कोणते मुद्दे लक्षात घेणे आवश्यक आहे? 5

4. खालीलपैकी **कोणतेही चार** उपप्रश्न सोडवा.

अ) पॉलिहाऊसमधील रूट मेडीयाचे गुणधर्म कोणते ते लिहा. 5

ब) गुलाबाच्या जुन्या झाडाचे नुतनीकरण कसे करतात? 5

क) गुलाब पिकावरील 'वाळवी'चा प्रादुर्भाव व त्यावरील उपाय सुचवा. 5

ड) जरबेरा फुलांची काढणी, उत्पादन व साठवन या विषयी थोडक्यात माहिती लिहा. 5

इ) फुले आणि भाजीपाल्याच्या बीजोत्पादनासाठी पॉलिहाऊसची उपयुक्तता स्पष्ट करा. 5